# हिंगणघाट पोलीसांची कार्यवाही
# बस स्टॅण्ड हिंगणघाट येथील मंगळसुत्र चोरीचा गुन्हा २४ तासाच्या आत उघड

दिनांक ०१-११-२०२१ रोजी दुपारी दरम्यान हिंगणघाट येथील बस स्टॅण्ड येथे एका महिलेचे सोन्याचे मंगळसुत्र चोरल्याने पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे अपराध क्र. १०१७/२०२१ कलम ३७९ भादंविचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून गोपनीय माहितीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपी नामे श्रीमती सरलाबाई दौलतराव राखडे, रा. अशोक नगर, वार्ड क्र. २८, वर्धा हिला ताब्यात घेवुन तीची चौकशी केली असता तीने पोस्टे हिंगणघाट हद्दीतील बस स्टॅण्ड मधुन एक महिलेची सोन्याचे मंगळसुत्र चोरल्या बाबतची कबुली दिल्याने तीचेकडुन दागिणे जप्त करून सदरचा गुन्हा २४ तासाच्या आत उघडकिस करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक, वर्धा श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट, श्री दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात पो.नि. श्री. संपत चव्हाण यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार शेखर डोंगरे, निलेश तेलरांधे, सचिन घेवंदे, विशाल बंगाले, सचिन भारशंकर, राहुल साठे, प्रतिभा दुधबळे यांनी केली आहे.